यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना, (ता.जि. यवतमाळ) या योजनेतील चापडोह प्रकल्पांतर्गत भूसंपादन वाढीव मोबदला रक्कम अदा करणे बाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन शुद्धीपत्रक क्रमांक सुप्रमा-१८१७/प्र.क्र. १५३/पापु-१३

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मुंबई-४०० ०३२

तारीख: ६ मार्च, २०१८.

वाचा -

१) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.मजीप्रा/वित्त-२/ निधी/कोर्ट/यवतमाळ/११४०/२०१७, दिनांक १८/११/२०१७

२) शासन निर्णय क्रमांक सुप्रमा-१८१७/ प्र.क्र. १५३/पापु-१३, दिनांक ५/१२/२०१७.

३) संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई यांचे क्र. मजीप्रा/वित्त-२/निधी शाखा/ ४६/ २०१८, दिनांक २१/२/२०१८ चे पत्र

प्रस्तावना

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे संदर्भ क्र. २ येथील दिनांक १८/११/२०१७ च्या पत्रान्वये यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजनेतील चापडोह प्रकल्पांतर्गत न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार चापडोह प्रकल्पांतर्गत भूसंपादन प्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्वनिधीतून अदा केलेला निधी (रु. १२८.२६ लक्ष + रु. ३५.६१ लक्ष) रु १६४.०७ आणि न्यायालयीन आदेशानुसार प्राप्त प्रकरणापोटी रु. ११८.०० लक्ष व्याजासहीत अशी एकूण रु.२८२.०७ लक्ष इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये रु.२८२.०७ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला होता.

तथापि, संचालक वित्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा., यवतमाळ यांचेकडून प्रत्यक्षात आवश्यक रकमेबाबत माहिती घेतली असून त्यानुसार, त्यांच्या उपरोक्त दिनांक २१/२/२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावानुसार , महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्वनिधीतून वाटपासाठी वापरलेली रक्कम रु. १,६१,४८,५५७/- व न्यायालयाच्या

आदेशानुसार वाटपासाठी शिल्लक रक्कम रु. १,०५,२४,५२४/- अशी एकूण रु. २,६९,३१,५२४/- एवढी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वितरीत करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार, उपरोक्त दिनांक ०५/१२/२०१७ रोजीच्या आदेशात सुधारणा करणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

शासन शुध्दीपत्रक –

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांच्या विनंतीस अनुसरुन, यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना, ता.जि. यवतमाळ या योजनेच्या चापडोह प्रकल्पांतर्गत भूसंपादन प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार भूसंपादनाचा वाढीव मोबदला अदा करण्याकरीता जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे रक्कम जमा करण्यासाठी तसेच यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या भूसंपादनाच्या वाढीव मोबदला देण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने यापूर्वी स्व-निधीतून केलेल्या "रु.**२८२.०७** लक्ष रकमे ऐवजी रु. **२,६९,३१,५२४/-** (रुपये दोन कोटी एकोणसत्तर लक्ष एकतीस हजार पाचशे चोवीस फक्त) इतकी रक्कम मंजूर करण्यात येत आहे**".**

२. दिनांक **५/१२/२०१७** रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

३. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०५१४२५२६१३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh D. Ambekar

Digitally signed by Suresh D. Ambekar
DN: CN = Suresh D. Ambekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2018.03.06 14:55:55 +05'30'

(सु.दे.आंबेकर)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

२) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
३) विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधान परिषद, विधान मंडळ, मुंबई.
४) मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
६) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१/ महाराष्ट्र-२, मुंबई/ नागपूर.
७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१/ महाराष्ट्र-२,मुंबई/ नागपूर.
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) जिल्हाधिकारी, यवतमाळ
१०) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती.
११) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती
१२) संचालक(वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई.
१३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, यवतमाळ
१४) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१६) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२०) मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२१) कार्यासने (पापु-०४, ०६,०७,०९,१०,१७,१८ व २०), पा. पु. व स्व. वि.,मंत्रालय,मुंबई-३२.
२२) निवडनस्ती कार्यासन पापु-१३.